**L. A. BILL No. LX OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2023.

## सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६०.

## महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

२०२४ चा महा. ८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,– २०२४ चा महा. ८.

(एक) खंड (ख) मधील, " विद्याविषयक " या मजकुरानंतर, ",आरोग्य विज्ञान" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) खंड (ढ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(ढ-क) "आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम" याचा अर्थ, वैद्यकीय, दंत वैद्यक, आयुर्वेद, समचिकित्सा (होमिओपॅथी), युनानी, सिद्ध, भौतिकोपचार, व्यवसाय उपचार, परिचर्या, पुनर्वसन, परावैद्यक पाठ्यक्रम व संलग्न आरोग्य विज्ञान यांच्याशी संबंधित असलेले पाठ्यक्रम, असा आहे;";

(तीन) खंड (प) मधील, "भारतीय वैज्ञानिक व संशोधन परिषद" या मजकुरानंतर, ",राष्ट्रीय दंतवैद्यक आयोग, भारतीय परिचर्या परिषद, राष्ट्रीय संलग्न व आरोग्य सेवा व्यवसाय आयोग, भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोग, भारतीय पुनर्वसन परिषद, राष्ट्रीय समचिकित्सा आयोग व आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांच्या इतर कोणत्याही सक्षम नियामक संस्था," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(चार) खंड (यख) मधील, " पदविका, पदवी" या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, अधिछात्रवृत्ती, विद्यावाचस्पती, विद्यावाचस्पत्युत्तर पदवी " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (बावीस) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(बावीस-क) आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांच्या बाबतीत, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) नुसार, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून मिळालेले ना-हरकत प्रमाणपत्रः १९९९ चा महा. १०.

परंतु, जर अर्जदार प्रायोजक मंडळास, अर्ज केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही तर, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि अशा प्रकरणांमध्ये, विनंती अर्जाची पोचपावती सादर करण्यात येईल;".

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ मध्ये नवीन कलम ४क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः-

आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणारी विद्यापीठे स्थापन करण्याची पात्रता.

"**४क.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या प्रायोजक मंडळाचे, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) 'अ' व त्यावरील श्रेणीच्या मानांकासह (एकत्रित श्रेणी गुण सरासरी (सीजीपीए) ३.०१ व त्यापेक्षा अधिक) आरोग्य विज्ञान शिक्षण क्षेत्रात वीस वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असलेले मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय आहे आणि ज्यामधील किमान पन्नास टक्के विद्याशाखांमध्ये पदव्युत्तर पाठ्यक्रम सुरू आहेत आणि ते किमान दहा वर्षांपासून कार्यरत आहे, केवळ तेच प्रायोजक मंडळ या अधिनियमान्वये आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणारे विद्यापीठे स्थापन करण्यासाठी अर्ज करण्यास पात्र असेल.".

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (५) मधील, " पदवी, पदविका, किंवा प्रमाणपत्र" या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, अधिछात्रवृत्ती, विद्यावाचस्पती पदवी किंवा विद्यावाचस्पत्युत्तर पदवी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील, पोट-कलम (१) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः-

" परंतु, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांसाठी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे, वित्त विभागाचे व नियोजन विभागाचे सचिव यांचा समावेश असलेली, स्वतंत्र सचिव स्तरीय समिती असेल.".

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मधील, पोट-कलम (१) मध्ये,-

(एक) खंड (क) मधील, " माहिती व दळणवळण तंत्रज्ञान" या मजकुरानंतर, ",आरोग्य विज्ञान, म्हणजेच वैद्यकीय, दंत वैद्यक, आयुर्वेद, समचिकित्सा (होमिओपॅथी), युनानी, सिद्ध, भौतिकोपचार, व्यवसाय उपचार, परिचर्या, पुनर्वसन, परावैद्यक पाठ्यक्रम व संलग्न आरोग्य विज्ञान " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल;

१९६१ चा २५.
२०१९ चा ३०.
२०२०चा १४.
१९४७ चा ४८.
२०२३ चा २१.
१९९२ चा ३४.
२०२१ चा १४.
२०२० चा १५.

(दोन) खंड (त) मधील, " अधिवक्ता अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेल्या भारतीय वकील परिषदेने" या मजकुरानंतर, "किंवा राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अधिनियम,२०१९ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने किंवा भारतीय वैद्यक पद्धती राष्ट्रीय आयोग अधिनियम,२०२० अन्वये घटित केलेल्या भारतीय वैद्यक पद्धती राष्ट्रीय आयोगाने किंवा भारतीय परिचर्या परिषद अधिनियम, १९४७ अन्वये घटित केलेल्या परिषदेने किंवा राष्ट्रीय दंतवैद्यक आयोग अधिनियम,२०२३ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय दंतवैद्यक आयोगाने किंवा भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम,१९९२ अन्वये घटित केलेल्या भारतीय पुनर्वसन परिषदेने किंवा राष्ट्रीय संलग्न व आरोग्य सेवा व्यवसाय आयोग अधिनियम, २०२१ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय संलग्न व आरोग्य सेवा व्यवसाय आयोगाने किंवा राष्ट्रीय समचिकित्सा आयोग अधिनियम, २०२० अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय समचिकित्सा आयोगाने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १० ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये,-

(एक) खंड (दोन) मधील, " पुरस्कार, श्रेण्या, श्रेयांक व विद्याविषयक विशेषोपाध्या" या मजकुराऐवजी, " पदव्युत्तर पदव्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावाचस्पती पदव्या, विद्यावाचस्पत्युत्तर पदव्या, पुरस्कार, श्रेण्या, श्रेयांक व विद्याविषयक विशेषोपाध्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (सोळा) मधील, " किंवा प्रमाणपत्रे" या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्रे, पदव्युत्तर पदव्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावाचस्पती पदव्या, विद्यावाचस्पत्युत्तर पदव्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (५) मधील, " उच्च शिक्षण संचालकाकडून " या मजकुरानंतर, "आणि आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांच्या बाबतीत, संयुक्त धारक म्हणून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालकाकडून" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ग) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :-

"परंतु, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांच्या बाबतीत, पाच व्यक्तींपैकी, प्रायोजक मंडळाने नामनिर्देशित केलेले दोन आरोग्य विज्ञान तज्ज्ञ असतील.".

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मधील, पोट-कलम (२) मध्ये,-

(एक) खंड (ग) मधील, " पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे " या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्रे पदविका, पदव्या, पदव्युत्तर पदव्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावाचस्पती पदव्या, विद्यावाचस्पत्युत्तर पदव्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) खंड (च) मध्ये, " पदव्या व पदविका " या मजकुराऐवजी, " प्रमाणपत्रे, पदविका, पदव्या, पदव्युत्तर पदव्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावाचस्पती पदव्या व विद्यावाचस्पत्युत्तर पदव्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ४१ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१ मध्ये,-

(एक) पोट-कलम (२) मधील, पहिल्या परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईलः-

" परंतु आणखी असे की, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी विद्यापीठांमधील प्रवेश, राष्ट्रीय पात्रता-नि-प्रवेश परीक्षेच्या (नीटच्या) किंवा केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या इतर कोणत्याही प्रवेश चाचणीच्या आधारे देण्यात येतील;" ;

(दोन) पोट-कलम (३) मधील, "आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस)" या मजकुरानंतर, "आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी)" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(तीन) पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः-

"(५) आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी, संबंधित नियामक मंडळाने ठरविलेल्या सामाईक समुपदेशन प्रक्रियेमार्फत प्रवेश देण्यात येतील.".

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ५१ ची सुधारणा.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५१ मध्ये, पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईलः-

"(७) राज्य शासनास,-

(क) विद्यापीठाकडून अनुपालन अहवाल मागविता येईल;

(ख) संबंधित नियामक मंडळाच्या परवानग्यांच्या आधारे, पुढे चालू ठेवण्याच्या स्थितीचे पुनर्विलोकन करता येईल;

(ग) संबंधित नियामक मंडळाने परवानगी काढून घेतल्यास किंवा निलंबित केल्यास प्रवेशांवर निर्बंध घालता येतील.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. ८) यामध्ये, महाराष्ट्र राज्यामध्ये उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्यासाठी राज्यामध्ये स्वयं-अर्थसहाय्यित खाजगी विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्यासाठी तरतूद केली आहे. अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, इत्यादी सारख्या विविध व्यावसायिक विद्याशाखांचा समावेश असणाऱ्या उच्च व तंत्र शिक्षणामधील शिक्षण, अध्यापन, संशोधन व विकास करण्याच्या उद्देशाने राज्यात विविध खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यात आली आहेत.

**२.** जनतेच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आरोग्य विज्ञान व संलग्न पाठ्यक्रमांच्या सर्व विद्याशाखांमधील मोठ्या संख्येतील वैद्यकीय व परावैद्यक व्यावसायिकांची आवश्यकता आहे. भारतातील इतर राज्यांमधील खाजगी विद्यापीठांमध्ये आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये खाजगी आरोग्य विज्ञान विद्यापीठे स्थापन करण्यासाठी अनेक संस्थांकडून मागणी करण्यात आली आहे. प्रदीर्घ अनुभव व उत्कृष्टता असलेल्या आरोग्य विज्ञान विषयातील पाठ्यक्रम चालविणाऱ्या खाजगी संस्थांना राज्यात खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास परवानगी देणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

**३.** आरोग्य विज्ञान शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी असलेल्या संस्थाच केवळ खाजगी आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्यास पात्र असतील याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, असे प्रस्तावित करण्यात येत आहे की, ज्या प्रायोजक मंडळाचे, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) 'अ' व त्यावरील श्रेणीच्या मानांकासह (एकत्रित श्रेणी गुण सरासरी (सीजीपीए) ३.०१ व त्यापेक्षा अधिक) आरोग्य विज्ञान शिक्षण क्षेत्रात वीस वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असलेले मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय आहे आणि ज्यामधील किमान पन्नास टक्के विद्याशाखांमध्ये पदव्युत्तर पाठ्यक्रम सुरू आहेत आणि ते किमान दहा वर्षांपासून कार्यरत आहे, ते प्रायोजक मंडळच केवळ उक्त अधिनियमान्वये आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणारी विद्यापीठे स्थापन करण्यासाठी अर्ज करण्यास पात्र असेल. म्हणून, आरोग्य विज्ञान शिक्षण देणाऱ्या अशा संस्थांना आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणारी विद्यापीठे स्थापन करता येणे शक्य व्हावे म्हणून उक्त अधिनियमात सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ८ जुलै, २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

(शा.म.मु.)एचबी-९०९–२ (१०४५-०७-२६)

## सन २०२६ चे वि.स.वि. क्र. ६०.—महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६ याचे परिशिष्ट.

## ( महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यातील उतारे )

## ( सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ )

**१.** *** *** ***

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,- व्याख्या.

(क) *** *** ***

(ख) "संलग्न प्राध्यापक", " संलग्न सहयोगी प्राध्यापक" किंवा " संलग्न सहायक प्राध्यापक" यांचा अर्थ, विद्यापीठाबरोबरच्या सहयोगाच्या किंवा साहचर्याच्या कालावधीत जी तशी पदनिर्देशित केली आहे अशी उद्योग, व्यापार, कृषी, वाणिज्य, सामाजिक, सांस्कृतिक, विद्याविषयक किंवा इतर कोणत्याही संलग्न क्षेत्रांमधील व्यक्ती, असा आहे ;

(ग) ते (न) *** *** ***

(प) "विनियामक मंडळ" याचा अर्थ, उच्च शिक्षणाचा विद्याविषयक दर्जा सुनिश्चित करण्याची, मानके व शर्ती निर्धारित करण्याकरिता केंद्र सरकारने स्थापन केलेले, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, राष्ट्रीय वैद्यक आयोग, भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषद, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, भारतीय कृषि संशोधन परिषद, दूरस्थ शिक्षण परिषद, भारतीय वैज्ञानिक व संशोधन परिषद, इत्यादींसारखे मंडळ, असा आहे, आणि त्यात शासनाचा समावेश होतो;

(फ) ते (यक) *** *** ***

(यख) "विद्यार्थी" याचा अर्थ, संशोधन पदवीसह, विद्यापीठाने सुरू केलेल्या पदवी, पदविका किंवा अन्य विद्याविषयक विशेषोपाध्या यांचा अभ्यास पाठ्यक्रम घेण्यासाठी विद्यापीठात नावनोंदणी केलेली व्यक्ती, असा आहे ;

(यग) ते (यड़) *** *** ***

**३.** (१) *** *** *** विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल.

(२) सविस्तर प्रकल्प अहवालात पुढील तपशिलांचा अंतर्भाव असेल :—

(एक) ते (एकविस) *** *** ***

(बावीस) विनियामक मंडळांच्या मानकांचे पालन करण्याची बांधिलकी;

(तेवीस ) व (चोवीस) *** *** ***

**४.** व **५.** *** *** ***

**६.** (१) ते (४) *** *** *** विद्यापीठाची स्थापना व विधिसंस्थापन.

(५) विद्यापीठ, या अधिनियमान्वये स्थापन केलेले असंलग्न एकात्म विद्यापीठ म्हणून कार्य करील आणि त्यात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी किंवा बहाल करण्यासाठी इतर कोणत्याही महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला संलग्न असणार नाही.

(६) व (७) *** *** ***

सचिवस्तरीय समिती. **७.** (१) विद्यापीठाच्या स्थापनेनंतर, प्रायोजक मंडळ, त्याने सादर केलेल्या हमींचे आणि इरादापत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विद्यापीठाच्या कार्यान्वयनाशी संबंधित असणाऱ्या शर्तींचे आणि या अधिनियमाच्या तरतुदींचे व त्याखाली केलेल्या नियमांचे प्रायोजक मंडळ अनुपालन करीत आहे किंवा कसे याची पडताळणी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वित्त विभाग आणि नियोजन विभाग यांचा समावेश असलेली एक सचिवस्तरीय समिती करील.

(२) ते (४) *** *** ***

**८.** *** *** ***

विद्यापीठाची उद्दिष्टे. **९.** (१) विद्यापीठाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील :—

(क) अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, विधि, व्यवसाय व वाणिज्य, उपयोजित व सृजनात्मक कला, व्यवसाय शिक्षण, प्रसारमाध्यम, माहिती व दळणवळण तंत्रज्ञान व मूलभूत शिक्षण आणि त्यांचा आंतरविद्याशाखीय, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम व विकास यांसारख्या मुक्त कला, मानव्य विद्या, सामाजिक शास्त्रे, जीवन शास्त्रे व जैव तंत्रज्ञाने, अतिसूक्ष्म (नॅनो) शास्त्रे व तंत्रज्ञाने, व्यावसायिक विद्याशाखा यांचा अंतर्भाव असलेले उच्च व तंत्र शिक्षणामधील अध्ययन करणे, अध्यापन करणे, क्षमता, कर्तृत्व व कौशल्य विकास करणे आणि संशोधन व विकास करणे ;

(ख) ते (ण) *** *** ***

(त) विद्यापीठाने प्रदान केलेल्या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाध्या, अखिल भारतीय तंत्रशिक्षण अधिनियम, १९८७ अन्वये स्थापन केलेल्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद अधिनियम, १९९३ अन्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेने किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ अन्वये घटित केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा औषधशास्त्र अधिनियम, १९४८ अन्वये घटित केलेल्या भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेने, किंवा अधिवक्ता अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेल्या भारतीय वकील परिषदेने किंवा, यथास्थिति, इतर कोणत्याही सांविधिक मंडळाने निर्धारित केलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसतील याची सुनिश्चिती करणे.

(२) व (३) *** *** ***

विद्यापीठाचे अधिकार व कार्ये. **१०.** विद्यापीठाचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) *** *** ***

(दोन) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, पुरस्कार, श्रेण्या, श्रेयांक व विद्याविषयक विशेषोपाध्या सुरू करणे व प्रदान करणे ;

(तीन) ते (पंधरा) *** *** ***

(सोळा) राज्य शासन, भारत सरकार व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या अनुदेशांनुसार देशांतर्गत व देशाबाहेरील इतर विद्यापीठांच्या संबंधात प्रतियोगी तत्त्वावर दुहेरी, पदव्या, पदविका किंवा प्रमाणपत्रे देण्याची तरतूद करणे ;

(सतरा) ते (तेहतीस ) *** *** ***

**११.** व **१२.** *** *** ***

दाननिधी. **१३.** (१) ते (४) *** *** ***

(५) विद्यापीठाचे विसर्जन होईपर्यंत, दाननिधीची रक्कम अशा प्रकारे निधीतून गुंतविलेल्या रकमा, शासनाच्या परवानगीशिवाय काढण्यात येणार नाही या शर्तीस अधीन राहून, संयुक्त धारक म्हणून उच्च शिक्षण संचालकाकडून राष्ट्रीयीकृत बँकेत नियत ठेवीच्या स्वरुपात, विद्यापिठाकडून गुंतवण्यात येईल.

**१४.** ते **२६.** *** *** ***

**२७.** (१) विद्यापीठाच्या नियामक मंडळात, पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :- नियामक मंडळ.

(क) व (ख) *** *** ***

(ग) प्रायोजक मंडळाकडून नामनिर्देशित केलेल्या पाच व्यक्ती, त्यांपैकी दोन ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ असतील ;

(घ) ते (छ) *** *** ***

(२) ते (५) *** *** ***

**२८.** ते **३७.** *** *** ***

**३८.** (१) *** *** *** पहिले आदेश.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींना आणि त्याखाली केलेल्या नियमांस किंवा परिनियमांस अधीन राहून, व्यवस्थापन मंडळास, विद्यापीठाच्या उद्दिष्टांना चालना देण्यासाठी त्याला योग्य वाटेल असे पहिले आदेश, नियामक मंडळाच्या मान्यतेने काढता येतील आणि त्या आदेशांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) व (ख) *** *** ***

(ग) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाध्या प्रदान करणे, त्यांची किमान अर्हता आणि त्या देण्याच्या व मिळण्याच्या संबंधात करावयाच्या उपाययोजना ;

(घ) व (ड़) *** *** ***

(च) विद्यापीठाचे विविध पाठ्यक्रम, परीक्षा, पदव्या व पदविका यांच्यासाठी आकरावयाचे शुल्क;

(छ) ते (ट) *** *** ***

(३) *** *** ***

**३९.** व **४०.** *** *** ***

**४१.** (१) *** *** *** प्रवेश.

(२) विद्यापीठामधील प्रवेशाची गुणवत्ता, एकतर प्रवेशासाठी असलेल्या अर्हताकारी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या किंवा श्रेणीच्या आधारे आणि अभ्यासानुवर्ती व अभ्यासेतर कार्यक्रमांमधील संपादणुकींच्या आधारे किंवा एकतर तत्सम पाठ्यक्रम चालविणाऱ्या विद्यापीठांच्या संघाने किंवा राज्यातील कोणत्याही अभिकरणाने राज्य स्तरावर घेतलेल्या प्रवेश चाचणीत मिळालेल्या गुणांच्या किंवा श्रेणीच्या आधारे निर्धारित करता येईल :

परंतु, व्यावसायिक व तंत्र पाठ्यक्रमांमधील प्रवेश, केवळ प्रवेश चाचणी मार्फतच देण्यात येतील.

(३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) यांमधील विद्यार्थ्यांकरिता आणि दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठांमधील प्रवेशासाठी राज्य शासनाच्या धोरणानुसार जागा राखून ठेवण्यात येतील.

(४) *** *** ***

**४२.** व **५९.** *** *** ***

**अनुसूची** *** *** ***

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक**
**क्रमांक ६०.]**

**[महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व**
**विनियमन) अधिनियम, २०२३ यात**
**आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री. ]

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.